महाराष्ट्र शासन

क्रमांक: व्हिएलएस १०८४/ — /
[सीआर-२०२६६]प्राशि-३
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- ६ एप्रिल, १९८५

प्रति,
व्यवस्थापक,
पुणे विद्यार्थी गृहाचे
मुक्तांगण इंग्लीश स्कूल, घोरपडे बाग,
पर्वती, पुणे-९

विषय:- मुक्तांगण इंग्लीश स्कूल, सहकारनगर, पुणे.

प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याबाबत.

महोदय,

आपण दिनांक 3-१०-१९८४ रोजी मा. शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे. शिक्षण प्रमुख, २ यांना वरील विषयासंबंधी लिहिलेल्या पत्राच्या संदर्भात आपणास कळविण्यांत येते की, उपरोल्लिखित संस्थेस सहकारनगर, पुणे-९ येथे इंग्रजी (इ. १ ली ते ४ थी) माध्यमातून, विना अनुदान तत्वावर, जून १९८४ पासून नवीन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचे योग्य ते आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना देण्यात आले आहेत. पुढील कार्यवाहीसाठी आपण कृपया त्यांच्याशी परस्पर संपर्क साधावा.

आपली विश्वासू,

[वृं. मी. कुलकर्णी]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

केवारी/१४.८.